दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com




**सुविचार**

अपयश नावाच्या रोगासाठी आत्मविश्वास आणि अथक परिश्रम हे जगातील सर्वात गुणकारी औषधे आहेत.

■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 86 ■ शुक्रवार , 19 जून 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com

## स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीत विक्रमी मतदान

# २९ पैकी २८ केंद्रांवर १०० टक्के मतदान

■ ९८८ पैकी ९८३ मतदारांनी बजावला हक्क; तीन जिल्ह्यांतील मतदान प्रक्रिया शांततेत

■ महायुतीची शिस्तबद्ध मोर्चेबांधणी, महाविकास आघाडी मात्र विस्कळीत



आरंभ मराठी । धाराशिव

**उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी गुरुवारी (दि.१८) तीनही जिल्ह्यांतील २९ मतदान केंद्रांवर शांततेत मतदान पार पडले. एकूण ९८८ मतदारांपैकी ९८३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावत तब्बल ९९.४९ टक्के मतदानाची नोंद झाली. २८ मतदान केंद्रांवर १०० टक्के मतदान झाले असून केवळ लातूर तहसील कार्यालयातील एका केंद्रावर पाच मतदारांनी मतदान न केल्याने मतदानाची टक्केवारी ९४.३२ इतकी राहिली. आता या निवडणुकीची मतमोजणी २२ जून रोजी धाराशिव येथे होणार आहे.**

उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूक-२०२६ करिता गुरुवारी (दि.१८) सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत २९ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. धाराशिव, लातूर आणि बीड या तीन जिल्ह्यांतील २९ मतदान केंद्रांवर ही मतदान प्रक्रिया झाली. यामध्ये २८ मतदान केंद्रांवर १०० टक्के मतदानाची नोंद झाली. केवळ लातूर तहसील कार्यालयातील एकाच मतदान केंद्रावर ९४.३२ टक्के मतदान झाले. तीनही जिल्ह्यांतील ९८८ मतदारांपैकी ९८३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला, तर केवळ ५ मतदारांनी मतदान केले नाही.

उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीसाठी एकूण ९८८ मतदार होते. यामध्ये ४९९ पुरुष आणि ४८९ स्त्री मतदारांचा समावेश होता. त्यापैकी ४९३ पुरुष आणि ४९० स्त्री मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये धाराशिव जिल्हा परिषदेचे २७ पुरुष व ३६ स्त्री असे एकूण ६३ मतदार, जिल्ह्यातील दोन नगरपंचायत व आठ नगरपालिकांचे १३७ पुरुष व ११७ स्त्री असे एकूण २५४ मतदार, लातूर जिल्हा परिषदेचे ३२ पुरुष व ३७ स्त्री असे एकूण ६९ मतदार, पाच नगरपंचायत व चार नगरपालिकांचे ११२ पुरुष व १०९ स्त्री मतदार, लातूर महानगरपालिकेचे ४१ पुरुष व ३६ स्त्री असे एकूण ७७ मतदार तसेच बीड जिल्ह्यातील पाच नगरपंचायत व सहा नगरपालिकांचे १५० पुरुष व १५४ स्त्री असे एकूण ३०४ मतदार सहभागी होते.लातूर तहसील कार्यालयातील मतदान केंद्रावर दोन स्त्री आणि तीन पुरुष मतदारांनी मतदान केले नाही.

या निवडणुकीसाठी धाराशिव जिल्ह्यात ८, लातूर जिल्ह्यात १० आणि बीड जिल्ह्यात ११ अशी एकूण २९ मतदान केंद्रे होती. त्यापैकी २८ मतदान केंद्रांवर १०० टक्के मतदान झाले. या निवडणुकीसाठी धाराशिव येथे ९ मतदान केंद्राध्यक्ष व ३६ इतर मतदान अधिकारी, लातूर येथे ११ मतदान केंद्राध्यक्ष व ४४ इतर मतदान अधिकारी तसेच बीड येथे १२ मतदान केंद्राध्यक्ष व ४८ इतर मतदान अधिकारी कार्यरत होते. या निवडणुकीची मतमोजणी २२ जून रोजी भाई उद्धवराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धाराशिव येथे होणार आहे.

### तीन वाजताच मतदान प्रक्रिया पूर्ण

मतदान प्रक्रिया सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत सुरू होती. मात्र तिन्ही जिल्ह्यांतील सर्व मतदान केंद्रांवर दुपारी ३ वाजेपर्यंत मतदान पूर्ण झाल्याचे दिसून आले. सकाळी ८ ते ११ या कालावधीत तुरळक मतदारांनी मतदान केले. मात्र दुपारी १२ नंतर अनेक मतदारांनी एकत्र जाऊन मतदान केल्यामुळे दुपारी १२ ते ३ या कालावधीत मोठ्या प्रमाणात मतदान झाले.

### महाविकास आघाडी विस्कळीत

एकीकडे महायुतीकडून तीनही पक्षांचे सदस्य एकत्रित मतदानाला जात असताना दुसरीकडे महाविकास आघाडीत वेगळे चित्र पाहायला मिळाले. धाराशिव येथील मतदान केंद्रावर आघाडीतील तिन्ही पक्षांचे सदस्य एकत्रित दिसले नाहीत. प्रत्येक सदस्य आपल्या सोयीने मतदानासाठी जात होता. आघाडीच्या मतदारांमध्ये यावेळी फारसा उत्साह दिसून आला नाही.

### महायुतीचे सदस्य एकत्रच मतदानाला

धाराशिव नगरपालिकेतील महायुतीचे सर्व सदस्य दुपारी साडेबारा वाजता एकत्र तहसील कार्यालयात दाखल झाले. यावेळी आमदार राणा पाटील हे सर्व सदस्यांना मतदानासाठी घेऊन आले होते. नगराध्यक्ष, सर्व नगरसेवक तसेच स्वीकृत नगरसेवक असा जवळपास २५ मतदारांचा गट एकत्र आला होता. आमदार राणा पाटील यांनी सर्व सदस्यांना व्यवस्थित आणि घाईगडबड न करता मतदान करण्याचा सल्ला दिला. मतदारांची यादी, ओळखपत्र आणि मतदान कक्षात कोणत्या क्रमाने जायचे यासंदर्भात महायुतीकडून चोख नियोजन करण्यात आले होते. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांनी जिल्हा परिषदेच्या सर्व सदस्यांना मतदानासाठी एकत्र आणले होते.

## अभिषेक पूजेदरम्यानही आता तुळजाभवानी मातेचे पेड दर्शन

### मंदिर संस्थानचा महत्त्वपूर्ण निर्णय

आरंभ मराठी । तुळजापूर



तुळजाभवानी मातेच्या दर्शन व्यवस्थेत गुरुवारपासून महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला असून, आता अभिषेक पूजा सुरू असतानाही भाविकांना पेड दर्शनाचा लाभ घेता येणार आहे. मंदिर संस्थानच्या या नव्या निर्णयामुळे प्रथमच भाविकांना अभिषेक पूजेच्या वेळेतही ५०० रुपये व २०० रुपये देणगी दर्शन पासद्वारे दर्शन घेण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. यापूर्वी अभिषेक पूजा सुरू असताना पेड दर्शनाची सुविधा बंद असायची. त्यामुळे भाविकांना अभिषेक पूजा संपल्यानंतर सकाळी दहा वाजल्यानंतरच देणगी दर्शन पास मिळत होते. मात्र १८ जूनपासून लागू झालेल्या नव्या व्यवस्थेनुसार मंदिरातील दर्शन सुरू झाल्यानंतरच भाविकांना ५०० रुपये व २०० रुपये देणगी दर्शन पास उपलब्ध होणार असून ही सुविधा सायंकाळी साडेनऊ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे.

नवीन दर्शन व्यवस्थेनुसार ५०० रुपये व २०० रुपये देणगी दर्शन पासधारक तसेच धर्मदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची व्यवस्था दर्शन मंडपातून करण्यात आली आहे. त्यामुळे या मार्गाने दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना पिण्याचे पाणी, कुलर, स्वच्छतागृह तसेच स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्ष यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नवीन व्यवस्थेच्या पहिल्याच दिवशी दर्शन प्रक्रियेवर कोणताही विपरीत परिणाम झालेला दिसून आला नाही. उलट ५०० रुपये व २०० रुपये देणगी दर्शन रांगेतील भाविकांना पूर्वीप्रमाणेच कमी वेळेत आणि जलद गतीने तुळजाभवानी मातेचे दर्शन झाल्याचे दिसून आले. मंदिर संस्थानच्या या निर्णयामुळे दर्शन व्यवस्थेत अधिक सुसूत्रता येण्यास मदत होणार असून भाविकांकडूनही समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## लाखनगाव येथे टिप्परचा भीषण अपघात

### चालकाचा जागीच मृत्यू

आरंभ मराठी । वाशी



वाशी तालुक्यातील लाखनगाव येथे गुरुवारी सकाळी झालेल्या भीषण टिप्पर अपघातात चालकाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून कवडे कुटुंबावर शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पारा येथील एक टिप्पर पारगावकडून पारा दिशेने माल घेऊन येत होता. लाखनगाव परिसरातील उतारावर आल्यानंतर चालकाचे वाहनावरील नियंत्रण अचानक सुटल्याचे सांगितले जात आहे. नियंत्रण सुटल्याने टिप्पर रस्त्याच्या कडेला असलेल्या शेडवर जाऊन धडकला. अपघाताच्या वेळी चालक कृष्णा माणिकराव कवडे (रा. मालदारपुरी) यांनी स्वतःचा जीव वाचवण्यासाठी वाहनातून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. मात्र, टिप्पर त्यांच्या अंगावर कोसळल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली.

## ज्येष्ठ नागरिकाच्या गळ्यातील सोन्याची चैन लंपास

आरंभ मराठी । उमरगा

उमरगा बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने ज्येष्ठ नागरिकाच्या गळ्यातील सोन्याची चैन चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मुरलीधर तुकाराम बडवे (वय 72, रा. श्रीकृष्ण नगर, गोपाळपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर) हे दिनांक 22 एप्रिल 2026 रोजी सायंकाळी साडेचार वाजता उमरगा बसस्थानक येथे बसमध्ये चढत होते. त्यावेळी गर्दीचा फायदा घेत अज्ञात व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील 12 ग्रॅम वजनाची व 46 हजार 420 रुपये किमतीची सोन्याची चैन चोरून नेली. या प्रकरणी मुरलीधर बडवे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उमरगा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 303(2) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## तुळजाभवानी मंदिरातील VIP पास वाटप प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश

आरंभ मराठी । तुळजापूर

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानातील VIP (महत्त्वाचे व अतिमहत्त्वाचे व्यक्ती) दर्शन पासांच्या नियमबाह्य वाटप प्रकरणाची गंभीर दखल घेत मंदिर संस्थान प्रशासनाने सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. या प्रकरणामुळे मंदिर संस्थानचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते तथा सामाजिक कार्यकर्ते जयकुमार नागनाथ पांढरे यांनी संबंधित तक्रार आणि पुरावे सादर करून या प्रकरणाचा पाठपुरावा केला होता. त्यानंतर मंदिर संस्थानच्या व्यवस्थापक तथा तहसीलदार माया माने यांनी लेखाधिकारी यांना लेखी पत्र देऊन संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून तात्काळ अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. तक्रारीनुसार, VIP दर्शन व्यवस्थेच्या नोंदवहीमध्ये लाखो रुपयांचे पास नियमबाह्य पद्धतीने वितरित करण्यात आल्याने मंदिर संस्थानला आर्थिक फटका बसला आहे. या आरोपांमागील वस्तुस्थिती समोर आणण्यासाठी पारदर्शक आणि निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मंदिर संस्थानच्या हितासाठी आणि सत्य परिस्थिती जनतेसमोर यावी यासाठी कोणत्याही दबावाला बळी न पडता वस्तुनिष्ठ चौकशी करून संपूर्ण अहवाल सादर करावा, अशी मागणीही यावेळी करण्यात आली आहे.

## एटीएममधून पैसे काढून देण्याच्या बहाण्याने ज्येष्ठ नागरिकाची ७८ हजारांची फसवणूक

**धाराशिव** :- धाराशिव शहरातील एसबीआय बँकेच्या एटीएम केंद्रात पैसे काढून देण्याचा बहाणा करत एका अज्ञात व्यक्तीने ज्येष्ठ नागरिकाची ७८ हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वानेवाडी येथील रहिवासी राजेंद्र संभाजी उंबरे (वय ६५) हे ८ जून २०२६ रोजी दुपारी पावणे दोन वाजण्याच्या सुमारास धाराशिव येथील मोदाणी बिल्डिंगमधील एसबीआय बँकेच्या एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते. यावेळी एका अनोळखी व्यक्तीने त्यांना मी तुम्हाला पैसे काढून देतो असे सांगून मदतीचा बहाणा केला. सदर व्यक्तीने हातचलाखीने उंबरे यांचे एटीएम कार्ड स्वतःकडे ठेवून त्याऐवजी दुसरे कार्ड त्यांच्या हाती दिले. त्यानंतर संबंधित भामट्याने उंबरे यांच्या बँक खात्यातून विविध व्यवहारांद्वारे एकूण ७८ हजार रुपये काढून घेतल्याचे समोर आले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर राजेंद्र उंबरे यांनी १७ जून २०२६ रोजी आनंदनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३१८(४) अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास आनंदनगर पोलीस करीत आहेत.

## बहिणीचा पत्ता विचारत युवकाचे अपहरण

### मारहाण करून जीवे मारण्याची धमकी

आरंभ मराठी । लोहारा

लोहारा तालुक्यातील सास्तुर येथे एका युवकाला बेदम मारहाण करून जबरदस्तीने वाहनात टाकून पळवून नेल्याची गंभीर घटना घडली आहे. याप्रकरणी लोहारा पोलीस ठाण्यात आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी योगेश विनायक बारकुल (वय 37, रा. लोहारा, ता. लोहारा) यांनी दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दिनांक 17 जून 2026 रोजी पहाटे सुमारे 3 वाजण्याच्या सुमारास सास्तुर येथील काकासाहेब गायकवाड यांच्या घरासमोर ही घटना घडली.तक्रारीनुसार, आरोपी गफार रजाक शेख, रौफ रजाक शेख, रहीम रजाक शेख, रहीमुन बागवान शेख (सर्व रा. परळी, ता. परळी, जि. बीड) तसेच इतर पाच अनोळखी व्यक्तींनी फिर्यादीस आमची बहिण कोठे आहे, तिचा पत्ता सांग असे म्हणत अडवले. त्यानंतर गैरकायदेशीर जमाव जमवून फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी व काठीने मारहाण केली. तसेच त्यांना जबरदस्तीने एका वाहनात बसवून पळवून नेल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या मारहाणीत फिर्यादी जखमी झाले असून आरोपींनी त्यांना जीवे ठार मारण्याची धमकीही दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी लोहारा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम 140(4), 118(1), 189(1), 189(2), 190, 351(2) व 351(3) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

आरंभ मराठी

### धाराशिव जिल्ह्यातील निम्म्या बहिणी लाभापासून वंचित

## लाडक्या बहिणींच्या खात्यात मे महिन्याचा हप्ता वितरित

आरंभ मराठी । धाराशिव



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत मे महिन्याच्या सन्मान निधीची प्रतीक्षा अखेर संपुष्टात आली असून, १५ जूनपासून पात्र महिलांच्या बँक खात्यांमध्ये थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) पद्धतीने १५०० रुपयांचा निधी जमा होण्यास सुरुवात झाली आहे. मात्र धाराशिव जिल्ह्यातील निम्म्या लाभार्थी महिला लाभापासून वंचित राहिल्या असल्याचे समोर आले आहे. गेल्या महिन्यात राज्य शासनाने मार्च आणि एप्रिल या दोन महिन्यांचा एकत्रित हप्ता वितरित केला होता. त्यानंतर मे महिन्याचा निधी जूनमध्ये वितरित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. निधी टप्प्याटप्प्याने जमा होत असल्याने काही महिलांच्या खात्यांत रक्कम जमा झाली असून, उर्वरित लाभार्थ्यांना पुढील काही दिवसांत निधी प्राप्त होणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. राज्य शासनाच्या अधिकृत आकडेवारीनुसार एप्रिलअखेर राज्यभरातील एक कोटी ७७ लाख महिला या योजनेसाठी पात्र लाभार्थी म्हणून निश्चित करण्यात आल्या आहेत. त्यात धाराशिव जिल्ह्यातील अडीच लाख महिलांचा समावेश असल्याचा अंदाज आहे. जिल्ह्यात अनेक महिलांना ई-केवायसी, आधार-बँक खाते जोडणी, मोबाइल क्रमांकातील बदल, अपूर्ण कागदपत्रे आणि ऑनलाइन प्रणालीतील तांत्रिक अडचणींमुळे पडताळणी प्रक्रियेत अडथळे आले होते. धाराशिव जिल्ह्यातील ३८००० महिलांना केवायसी करण्यास सांगितले होते. त्यातील जवळपास सर्व महिलांनी केवायसी प्रक्रिया पूर्ण केली. मात्र मागील चार महिन्यांपासून या महिलांना लाडकी बहीण योजनेचे हप्ते अनियमितपणे मिळत आहेत. त्यातच जिल्ह्यातील जवळपास सव्वा लाख महिलांना योजनेचे पैसे मिळणे अचानक बंद झाल्यामुळे महिलांची चिंता वाढली आहे. मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील महिला व बालकल्याण कार्यालयात लाभ न मिळालेल्या महिला गर्दी करत असून, योजनेतून अपात्र केल्याचे समाधानकारक उत्तर त्यांना मिळत नसल्याने महिलांची नाराजी वाढत आहे. लाडकी बहीण योजना सुरू झाल्यानंतर धाराशिव जिल्ह्यात या योजनेचा लाभ ४ लाख १२ हजार महिलांना मिळत होता. योजनेतून हळूहळू महिला बाद करण्याचे प्रमाण वाढले आणि सध्या केवळ अडीच लाख महिलांना या योजनेचा लाभ मिळत आहे.

## तुळजाभवानी मातेच्या चरणी एक लाख रुपयांची देणगी

### मालती खानापूरकर यांचा मंदिर संस्थानकडून सन्मान

आरंभ मराठी । तुळजापूर



छत्रपती संभाजीनगर येथील श्री तुळजाभवानी देवींच्या निस्सीम भक्त मालती खानापूरकर यांनी श्री तुळजाभवानी मातेच्या चरणी एक लाख रुपयांची देणगी अर्पण केली. त्यांच्या या उदार देणगीबद्दल श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. मालती खानापूरकर या मुलगा व मुलीसह गुरुवारी सकाळी श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शनासाठी तुळजापूर येथे आल्या होत्या. दर्शनानंतर त्यांनी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानकडे एक लाख रुपयांची देणगी सुपूर्द केली. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपेंद्र तामोरे यांनी मालती खानापूरकर व त्यांच्या कुटुंबीयांचा श्री तुळजाभवानी देवींची प्रतिमा आणि महावस्त्र भेट देऊन सन्मान केला. या प्रसंगी मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.

# बोगस रासायनिक खतांचा मोठा भंडाफोड; जिल्हाधिकारी कार्यालयातच आणला बोगस खत

## ४०० पोते खत जप्त, कृषी सेवा केंद्र सील करण्याचे आदेश

**आरंभ मराठी । धाराशिव**

अणदूर परिसरात मागील काही दिवसांपासून बोगस रासायनिक खतांची विक्री होत असल्याच्या तक्रारींना अखेर पुष्टी मिळाली असून शेतकऱ्यांनी केलेल्या धाडसी कारवाईत सुमारे ५ लाख रुपये किमतीच्या ४०० ते ५०० खतांच्या पोत्यांमध्ये खताऐवजी लाल माती असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी संबंधित कंपनी व विक्रेत्याविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे तसेच कृषी सेवा केंद्र सील करण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत. अणदूर येथील दहा ते बारा शेतकऱ्यांना परिसरात बोगस खतांची विक्री होत असल्याचा संशय होता. या संशयाची खातरजमा करण्यासाठी त्यांनी अणदूर येथील ओंकार कृषी सेवा केंद्रातून सुमारे ४०० ते ५०० खतांची पोती खरेदी केली. या खतासाठी शेतकऱ्यांनी जवळपास ५ लाख रुपये मोजले होते.



खरेदी केलेल्या पोत्यांवर 20:20:0:13, 15:15:10, 18:46 आणि 10:26:26 अशा विविध रासायनिक खतांचे उल्लेख करण्यात आले होते. संबंधित खत 'शेतकरी खत कंपनी, कोल्हापूर' या कंपनीचे असल्याचे सांगण्यात आले. मात्र पोत्यांमध्ये प्रत्यक्षात खत नसून लाल माती मिसळण्यात आल्याचा संशय शेतकऱ्यांना आला. यानंतर शेतकऱ्यांनी संपूर्ण खताचा साठा एका टेम्पोमधून थेट धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयात आणला. सायंकाळी सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास कार्यालय परिसरात काही पोती उघडून पाहण्यात आली असता त्यामध्ये खताऐवजी लालसर माती असल्याचे दिसून आले. हा प्रकार समोर येताच प्रशासनात खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांनी तत्काळ कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना घटनास्थळी पाचारण केले. प्राथमिक पाहणीनंतर त्यांनी संबंधित कंपनी आणि विक्रेत्याविरुद्ध तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले. तसेच संबंधित कृषी सेवा केंद्र सील करण्याचे निर्देश देखील दिले. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजकुमार मोरे उपस्थित होते. प्रशासनाच्या निर्देशानुसार आनंदनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवींद्र खांडेकर यांनी कारवाई करत जवळपास ५०० खतांची पोती जप्त करून ती आनंदनगर पोलीस ठाण्यात नेली. खरीप हंगामाच्या तोंडावरच बोगस खतांचा हा प्रकार उघडकीस आल्याने शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. दोषींवर कठोर कारवाई करून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश करण्याची मागणी होत आहे.

# विधान परिषद निवडणूकीसाठी भूम तालुक्यात शंभर टक्के मतदान




**आरंभ मराठी । भूम**

लातूर-धाराशिव-बीड स्थानिक प्राधिकरण मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी गुरुवारी (दि.१८) भूम तालुक्यात मतदान प्रक्रिया शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. विशेष म्हणजे तालुक्यातील सर्व 29 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावत शंभर टक्के मतदानाची नोंद केली. मतदानासाठी तहसील कार्यालयात केंद्राची व्यवस्था करण्यात आली होती. सकाळी 7 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत मतदानाची वेळ निश्चित करण्यात आली होती. मात्र भूम तालुक्यातील सर्व मतदारांनी वेळेआधीच मतदान केल्याने सायंकाळी 4 वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पूर्ण झाली. भूम तालुक्यातील मतदारांमध्ये भूम नगरपालिकेचे 21 नगरसेवक (20 निवडून आलेले व 1 पदसिद्ध), 2 स्वीकृत नगरसेवक, 5 जिल्हा परिषद सदस्य आणि 1 पंचायत समिती सभापती यांचा समावेश होता. सर्व मतदारांनी मतदान केल्याने मतदानाची टक्केवारी शंभर राहिली. या निवडणुकीकडे लातूर, धाराशिव आणि बीड जिल्ह्यांचे लक्ष लागले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पक्षीय बलाबलाचा विचार करता सुरुवातीला ही निवडणूक भाजपसाठी तुलनेने सोपी मानली जात आहे. आता सर्वांचे लक्ष 22 जून रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे लागले आहे.

# तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची औद्योगिक सहल

## पवन ऊर्जा निर्मितीचा घेतला प्रत्यक्ष अनुभव

**आरंभ मराठी । धाराशिव**

तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयातील यांत्रिकी विभागाच्या तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांची औद्योगिक भेट नुकतीच धाराशिव येथील ग्रीन एनर्जी विंड मिल पॉवर प्लांट येथे आयोजित करण्यात आली होती. अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांची माहिती आणि पवन ऊर्जा निर्मितीची प्रत्यक्ष प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजावी, या उद्देशाने या सहलीचे आयोजन करण्यात आले होते. वाढत्या ऊर्जा गरजा लक्षात घेता देशात अपारंपरिक ऊर्जा निर्मितीला मोठे महत्त्व प्राप्त होत आहे. धाराशिव जिल्ह्यातही पवन ऊर्जा निर्मितीचे मोठे प्रकल्प उभारले जात असून यामुळे यांत्रिकी तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन शाखेतील विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत आहेत. ही बाब लक्षात घेऊन महाविद्यालयाने या औद्योगिक भेटीचे नियोजन केले होते. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना पवन ऊर्जा निर्मिती




प्रक्रिया, विंड टर्बाईनची रचना, त्यातील विविध घटक तसेच वीज निर्मितीचे तांत्रिक पैलू यांची प्रत्यक्ष माहिती घेण्याची संधी मिळाली. प्लांटचे साईट इंजिनिअर पाटील सर व कृष्णा जाधव यांनी विद्यार्थ्यांना विंड टर्बाईनचे कार्य, देखभाल, सुरक्षा उपाययोजना आणि पवन ऊर्जेचे भविष्यातील महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी टर्बाईन ब्लेड, टॉवर, नॅसेल आदी घटकांची प्रत्यक्ष पाहणी करून तांत्रिक ज्ञान आत्मसात केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. माने यांनी अशा औद्योगिक भेटींमुळे विद्यार्थ्यांमध्ये उद्योग क्षेत्राविषयी उत्सुकता वाढते आणि त्यांच्या व्यावहारिक ज्ञानात मोलाची भर पडते, असे सांगितले. अकॅडेमिक डीन व यांत्रिकी विभागाचे विभागप्रमुख डॉ. डी. डी. दाते यांनी भविष्यात अपारंपरिक ऊर्जेचे महत्त्व अधिक वाढणार असल्याने विद्यार्थ्यांनी या क्षेत्रातील संधींचा लाभ घ्यावा, असे मत व्यक्त केले. ही औद्योगिक भेट प्रा. एस. डी. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली असून एम. जी. चौधरी यांनी सहकार्य केले.

# मेंढा जि.प. शाळेतील मुख्याध्यापक पद तातडीने भरा; शालेय समितीचा आंदोलनाचा इशारा

**आरंभ मराठी । तेर**

धाराशिव तालुक्यातील मेंढा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकाचे रिक्त पद तातडीने भरावे, अशी मागणी शालेय व्यवस्थापन समितीने जिल्हा परिषद धाराशिवच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे केली आहे. मेंढा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक पद १ जुलै २०२५ पासून रिक्त असून, शाळेची एकूण विद्यार्थी संख्या सुमारे २०० आहे. मात्र गेल्या वर्षभरापासून मुख्याध्यापक नसल्याने शाळेच्या प्रशासनिक कामकाजासह शैक्षणिक गुणवत्तेवरही परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली



असल्याचे समितीने निवेदनात नमूद केले आहे. मुख्याध्यापक पद रिक्त असल्यामुळे शाळेतील विविध शैक्षणिक व प्रशासकीय कामांमध्ये अडचणी निर्माण होत असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची खंत ग्रामस्थ व पालकांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, मुख्याध्यापकाचे रिक्त पद आठ दिवसांच्या आत भरले नाही, तर ग्रामस्थांच्या वतीने आंदोलन छेडण्यात येईल. तसेच शाळेचे कार्यालय बंद करून शाळेचे कामकाज ठप्प करण्याचा निर्णय घेण्यात येईल, असा इशाराही शालेय व्यवस्थापन समितीने शिक्षणाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.

# कार्यकाळ नव्हे, कर्तृत्व महत्त्वाचे..


**शिवाजी विठ्ठल चौगुले**
मु.पो. मासा बेलेवाडी,
कागल-कोल्हापूर



भारतीय राजकीय इतिहासात दीर्घकाळ देशाचे नेतृत्व करणारे आणि जनमानसावर स्वतःचा अमिट प्रभाव पाडणारे नेते कमी नाहीत. आधुनिक भारताच्या इतिहासात पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यानंतर नरेंद्र मोदी हे असे नेते ठरले आहेत, ज्यांनी लागोपाठ तीन वेळा सार्वत्रिक निवडणुका जिंकून देशाचे नेतृत्व केले आहे. नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधानपदाची १२ वर्षे पूर्ण होत असताना, त्यांची तुलना भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कार्यकाळाशी केली जात आहे. पंडित नेहरू यांनी तीन निवडणुकांमध्ये विजय मिळवला होता, तर १९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांनी अंतरिम पंतप्रधानपदही सांभाळले होते. तीन सार्वत्रिक निवडणुकांमधील विजय आणि पहिल्या निवडणुकीपूर्वी अंतरिम पंतप्रधान म्हणून त्यांनी तब्बल १७ वर्षे देशाचे नेतृत्व केले. त्यातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या कार्यकाळाची बरोबरी नरेंद्र मोदी यांनी केली आहे. मात्र, केवळ कार्यकाळाची बरोबरी केल्यामुळे दोन नेत्यांची तुलना होऊ शकत नाही. कारण दोन्ही नेत्यांचा काळ, विचारसरणी आणि त्यांच्यासमोरील आव्हाने पूर्णपणे वेगळी होती. पंडित नेहरू यांनी भारताच्या जडणघडणीत आणि जागतिक प्रतिमेत आपले अढळ स्थान निर्माण केले आहे. जवाहरलाल नेहरू यांचा वैचारिक पाया समाजवादी होता.

ते राजकीय तत्त्वज्ञानाचे अभ्यासक होते. पंडित नेहरू यांचा दृष्टिकोन लोकशाही समाजवाद, धर्मनिरपेक्षता आणि अलिप्ततावाद यांवर आधारित होता. फाळणीच्या दुःखातून बाहेर पडणाऱ्या देशाला एकत्र बांधून ठेवणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे हे त्यांचे मुख्य ध्येय होते.

मोदी यांचे नेतृत्व सांस्कृतिक राष्ट्रवाद, मजबूत राष्ट्रीय ओळख आणि "सबका साथ, सबका विकास" अशा घोषणांवर आधारित आहे. नेहरूंच्या समाजवादाच्या जागी मोदी यांनी कल्याणकारी भांडवलशाही आणि थेट लाभ हस्तांतरणावर भर दिला. आर्थिक धोरणे आणि पायाभूत सुविधांचा अभाव असलेल्या काळात नेहरू यांनी पंतप्रधानपद सांभाळले. स्वातंत्र्यानंतर देशात सुई-टाचणीही तयार होत नव्हती. अशा वेळी नेहरू यांनी आयआयटी, आयआयएम आणि इस्रोसारख्या संस्थांच्या उभारणीची पार्श्वभूमी तयार केली. तसेच भाक्रा-नांगलसारखी मोठी धरणे उभारली. यातून देशाच्या हरितक्रांतीचा पाया रचला गेला. त्यांनी या प्रकल्पांना "आधुनिक भारताची मंदिरे" असे संबोधले. मोदी यांच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात अशी कोणती मंदिरे उभी करण्यात आली, हा चर्चेचा विषय ठरतो. पंडित नेहरू यांचा भर उद्योग उभारणे आणि उद्योग सरकारी नियंत्रणाखाली आणणे यावर होता. मोदी यांच्या कार्यकाळात भारत सरकारच्या निर्गुंतवणूक आणि खासगीकरण धोरणात मोठा बदल करण्यात आला. या काळात सरकारने धोरणात्मक निर्गुंतवणुकीवर भर दिला. याचा अर्थ केवळ शेअर्स विकणे नव्हे, तर कंपनीचे व्यवस्थापन आणि मालकीही पूर्णपणे खाजगी हातात सोपविणे असा होता. या काळात भारताने रस्ते, महामार्ग, विमानतळ आणि वंदे भारतसारख्या आधुनिक रेल्वेचे जाळे विस्तारले. भारत जगातील अकराव्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेतून पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला. मात्र, हा मान फार काळ टिकवून ठेवता आला नाही. भारताची पुन्हा घसरण झाल्याची चर्चा सुरू झाली. डॉलरच्या तुलनेत रुपया शंभरी पार करण्याच्या दिशेने जात असल्याचे चित्रही याच काळात दिसू लागले. परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत नेहरू यांच्या काळात जगाचे लक्ष भारताकडे होते. अलिप्ततावादी चळवळ आणि पंचशील तत्त्वे भारताने स्वीकारली होती. मोदी यांच्या काळात देशाने



बहुआघाडीचे धोरण आणि राष्ट्रीय हित सर्वोपरी हे तत्त्व स्वीकारले. मोदी समर्थक आणि भाजप नेत्यांकडून मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताचा जागतिक स्तरावर प्रभाव वाढला असून देश एक मजबूत आर्थिक शक्ती म्हणून उदयास येत असल्याचा दावा केला जातो. नेहरू यांच्या काळात गरिबी निर्मूलनासाठी मोठ्या योजनांपेक्षा संस्थात्मक उभारणीवर भर देण्यात आला होता. प्रशासकीय कारभार मजबूत करण्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. पंडित नेहरू यांनी या देशाचा पाया रचला. त्यावर त्यांच्या नंतर आलेल्या सर्व पंतप्रधानांनी देशाला अधिक मजबूत करण्याचे काम केले. यात लालबहादूर शास्त्री, इंदिरा गांधी, राजीव गांधी, नरसिंह राव आणि डॉ. मनमोहन सिंह या सर्व पंतप्रधानांनी आपल्या काळात देशाला विकासाच्या वाटेवर नेले आणि जागतिक राजकारणात वेगळी छाप निर्माण केली. राजीव गांधी यांनी नवतंत्रज्ञानावर भर दिला. त्यामुळेच आज आपण डिजिटल इंडिया म्हणून मिरवत आहोत. नरसिंह राव पंतप्रधान आणि डॉ. मनमोहन सिंह अर्थमंत्री असताना देशाने आर्थिक उदारीकरणाचा निर्णय घेत जागतिक स्पर्धेत स्वतःचे स्थान निर्माण केले. १९९० च्या दशकात भारताच्या खालावलेल्या आर्थिक स्थितीवर या जोडगोळीने मात केली आणि भविष्यातील महासत्तेचा पायाही रचला. लोकशाही संस्था आणि नेतृत्वशैलीचा विचार केला तर पंडित नेहरू हे संसदेतील चर्चेला आणि विरोधकांच्या मताला मोठा मान देत असत.त्यांच्या काळात संस्थांना स्वायत्तता देण्यात आली. तर मोदी यांचे नेतृत्व अधिक केंद्रीभूत मानले जाते, जिथे निर्णय घेण्याची प्रक्रिया एका व्यक्तीकडे अधिक केंद्रित झालेली दिसते. मोदी यांच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात अनेक धाडसी आणि ऐतिहासिक निर्णय घेण्यात आले.

त्यामध्ये कलम ३७० रद्द करणे, राम मंदिराची उभारणी आणि जीएसटीची अंमलबजावणी यांचा समावेश होतो. नेहरू यांच्या काळात राज्यांची पुनर्रचना आणि हिंदू कोड बिल हे ऐतिहासिक निर्णय मानले जातात. मोदी यांच्या कार्यकाळात बेरोजगारी, वाढती महागाई आणि सामाजिक ध्रुवीकरण या मुद्द्यांवर विरोधकांकडून सातत्याने टीका केली जाते. पंडित नेहरू हे आधुनिक भारताचे शिल्पकार होते. त्यांनी लोकशाहीचा पाया रचला आणि देशाला संस्थात्मक रूप दिले. त्यांनी टीकेलाही सकारात्मकतेने स्वीकारले. देशाचे वय आणि स्वातंत्र्याची वर्षे वाढतच जाणार आहेत. या संपूर्ण काळात नवनवीन पंतप्रधान येत राहतील. कोण किती काळ सत्तेत होते याची आकडेमोड करण्यापेक्षा कोणाच्या काळात देशाचा आणि नागरिकांचा किती विकास झाला, याची नोंद इतिहास घेत असतो. कार्यकाळ कोणाचा मोठा होता यापेक्षा कर्तृत्व कसे राहिले, याची नोंद इतिहास निश्चितच घेईल.

# आषाढी वारीसाठी संत एकनाथ महाराज पालखीचे वेळापत्रक जाहीर

## ७ जुलैपासून होणार पैठण ते पंढरपूर भक्तिमय प्रवास



**आरंभ मराठी । परंडा**

श्री संत एकनाथ महाराज देवस्थान संस्थान, श्रीक्षेत्र पैठण यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या श्रीमंत संत एकनाथ महाराजांच्या आषाढी वारी पालखी सोहळ्याचे यंदाचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. श्रीक्षेत्र पैठण ते श्रीक्षेत्र पंढरपूर असा हा पारंपरिक पालखी सोहळा पार पडणार असून हजारो वारकरी भक्तिभावाने या सोहळ्यात सहभागी होणार आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, पालखीचे प्रस्थान ७ जुलै २०२६ रोजी श्रीक्षेत्र पैठण येथून होणार आहे. विविध गावांमधील मुक्काम व विसाव्यांद्वारे प्रवास करत पालखी २४ जुलै २०२६ रोजी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे दाखल होणार आहे. पालखी मार्गातील प्रमुख मुक्काम पुढीलप्रमाणे आहेत : पैठण, पाटेगाव, हादगाव, माळेगाव, राशीन, रायमोह, परांडा, कंडारी, विटरगाव, कुर्डू, अरण, करकंब, होळे आणि पंढरपूर.पालखी मार्गावरील गावांमध्ये वारकऱ्यांच्या स्वागतासाठी विशेष तयारी करण्यात येत असून भजन, कीर्तन, हरिनाम सप्ताह तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. संत एकनाथ महाराजांच्या विचारांचा प्रसार आणि वारकरी संप्रदायाची परंपरा जपण्याच्या दृष्टीने हा पालखी सोहळा अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. आयोजकांनी वारकरी व भाविकांना शिस्त, स्वच्छता आणि भक्तिभाव जपत मोठ्या संख्येने या वारीत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. तसेच मार्गावरील गावांनीही पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी जय्यत तयारी सुरू केली आहे. आषाढी वारीच्या निमित्ताने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून जाणार आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
» पुणे कार्यालयः 1012,विंग B, पूर्वांचल,विबग्योर स्कुलशेजारी » कोल्हापूर कार्यालयः रिव्हॉल्युशन, दुसरा मजला, दाभोळकर कॉर्नर, स्टेशन रोड, करवीर.

## विविध वृत्त

# राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत शिराढोण येथे 25 शेतकऱ्यांना सोयाबीन बियाण्यांचे वाटप



**आरंभ मराठी । शिराढोण**

महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय खाद्यतेल अभियान (गळीतधान्य) योजनेअंतर्गत शिराढोण येथील रयतराज शेतकरी गटातील २५ शेतकऱ्यांना सोयाबीन बियाणे व जैविक संघाचे वाटप करण्यात आले. तालुका कृषि अधिकारी मारुती ओव्हाळ यांच्या मार्गदर्शनाखाली महाडीबीटी पोर्टलवर करण्यात आलेल्या ऑनलाइन अर्जानुसार रयतराज शेतकरी गटाची निवड करण्यात आली होती. गटाचे अध्यक्ष सुरेश महाजन यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर गटाला २५ बॅग सोयाबीन बियाणे व ६.२५ लिटर जैविक संघ मंजूर करण्यात आले. यावेळी मंडळ कृषि अधिकारी माधुरी चौगुले यांच्या हस्ते गटातील प्रत्येक शेतकऱ्याला २५ किलो वजनाची एक बॅग सोयाबीन बियाणे तसेच २५० मिली जैविक संघाचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान सहाय्यक कृषि अधिकारी पी. एच. गायकवाड यांनी उपस्थित शेतकऱ्यांना बदलत्या हवामानाचा शेतीवर होणारा परिणाम, पेरणीचे योग्य नियोजन, बियाण्यांची उगवण क्षमता तपासणी, रासायनिक व जैविक बीजप्रक्रिया, सरी-वरंबा तंत्र तसेच बीबीएफ पेरणी पद्धतीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या प्रसंगी मंडळ कृषि अधिकारी माधुरी चौगुले, सहाय्यक कृषि अधिकारी पी. एच. गायकवाड, रयतराज शेतकरी गटाचे अध्यक्ष सुरेश महाजन, उपाध्यक्ष अशोक महाजन, सचिव सतीश महाजन तसेच गटातील अन्य सभासद व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिराढोण आरोग्य केंद्राच्या दुरवस्थेविरोधात 21 जूनपासून आमरण उपोषण

## ॲड. अमोल माकोडे यांचा इशारा

**आरंभ मराठी । शिराढोण**

शिराढोण परिसरातील सुमारे ४० गावांसाठी आरोग्यसेवा देणाऱ्या शिराढोण प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दुरवस्थेविरोधात ॲड. अमोल रामराजे माकोडे यांनी २१ जूनपासून आरोग्य केंद्रासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. सध्या प्राथमिक आरोग्य केंद्र जीर्ण झालेल्या इमारतीत सुरू असून, छत गळत असल्यामुळे पावसाचे पाणी थेट रुग्ण, गरोदर माता, नवजात बालके तसेच औषधे व लसींवर पडत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या परिस्थितीमुळे रुग्णांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाल्याची चिंता व्यक्त करण्यात येत आहे.दरम्यान, शिराढोण येथे ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयासाठी २०१९ मध्ये १८.९५ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता आणि १४.७८ कोटी रुपयांचा कार्यारंभ आदेश देण्यात आला होता. मात्र मुदतवाढ देऊनही रुग्णालयाचे बांधकाम अद्याप पूर्ण झाले नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाला पूर्वसूचना देण्यात आली असून, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाकडेही तक्रार दाखल करण्यात आली आहे. शिराढोण व परिसरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा प्रश्न अत्यंत गंभीर असून, येत्या पावसाळी अधिवेशनात स्थानिक आमदारांनी याबाबत लक्षवेधी सूचना मांडावी, अशी मागणी ॲड. अमोल माकोडे यांनी केली आहे.

# उपआयुक्तपदी पदोन्नतीबद्दल संतोष राऊत यांचा शिराढोणमध्ये गौरव

## रामेश्वर माकोडे यांचाही सत्कार



**आरंभ मराठी । शिराढोण**

कळंब तालुक्यातील हसेगाव (शि.) येथील भूमिपुत्र तथा महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागात उप आयुक्त (गट-अ) पदावर पदोन्नती झालेल्या संतोष राऊत यांचा तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी रामेश्वर माकोडे यांचा शिराढोण ग्रामपंचायत कार्यालयात सत्कार करण्यात आला. यावेळी दोन्ही मान्यवरांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. या प्रसंगी उपस्थितांनी त्यांच्या प्रशासकीय कार्याचा गौरव करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमादरम्यान शिराढोण परिसरातील विविध प्रशासकीय व विकासात्मक विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः शिराढोण येथे अपर तहसील कार्यालय सुरू करण्यासाठी आवश्यक त्या स्तरावर प्रयत्न करण्याबाबत संतोष राऊत यांनी सकारात्मक भूमिका व्यक्त केली. त्यामुळे परिसरातील नागरिकांच्या अपेक्षांना बळ मिळाले आहे. या सत्कार समारंभास माजी सरपंच पद्माकर पाटील, भारतीय जनता पार्टी कळंब पूर्वचे उपाध्यक्ष किरण पाटील, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष नामदेव माकोडे, खरेदी-विक्री संघाचे तालुका उपाध्यक्ष संजय नान्नजकर, दीपक पाटील, अभिजित मुंदडा, अविनाश कोडेंकर, विजयकुमार गायकवाड, कलिम बागवान, निलेश नाईकवाडे, सतीश शिंपले, पवन म्हेत्रे, शाम जोशी, भूषण नान्नजकर, कापसे, आदेश गायकवाड, नरसिंग यादव, बालाजी धाकतोडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# शिराढोण येथे महाराणा प्रतापसिंह जयंती उत्साहात साजरी

**शिराढोण** :- वीर शिरोमणी, स्वाभिमान आणि शौर्याचे प्रतीक असलेल्या महाराणा प्रतापसिंह यांची जयंती शिराढोण येथील ग्रामपंचायत कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या शौर्य, राष्ट्रनिष्ठा, त्याग आणि स्वाभिमानी जीवनकार्याचा गौरव करत त्यांच्या आदर्शांचे स्मरण केले. तसेच महाराणा प्रताप यांच्या विचारांचा आदर्श घेऊन समाजहितासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमास सरपंच लक्ष्मीताई म्हेत्रे, निलेश नाईकवाडे, संताजी पाटील, पिंटू पाटील, काका पाटील, सुनील पांचाळ, अक्षय धाकतोडे यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भूम उपविभागीय अधिकारी कार्यालयातील सार्वजनिक शौचालयाची दुरवस्था

## नागरिकांकडून दुरुस्ती करण्याची मागणी

**आरंभ मराठी । भूम**

महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा वार्षिक योजना 2024-25 अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत भूम येथील उपविभागीय अधिकारी कार्यालय परिसरात नागरिकांच्या सोयीसाठी उभारण्यात आलेल्या आधुनिक सार्वजनिक शौचालयाची सध्या अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, तातडीने दुरुस्ती व स्वच्छता करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. भूम, परंडा आणि वाशी या तीन तालुक्यांतील नागरिक विविध शासकीय कामांसाठी मोठ्या संख्येने या कार्यालयात येत असतात. त्यांच्या मूलभूत गरजा लक्षात घेऊन शासनाच्या निधीतून ही सुविधा उभारण्यात आली होती. मात्र, संबंधित प्रशासनाकडून देखभाल आणि व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष झाल्याने अवघ्या एक ते दीड वर्षांतच शौचालयाची अवस्था बिकट झाली आहे. शौचालयामध्ये मोठ्या प्रमाणात घाण साचली असून अनेक ठिकाणी तोडफोड झालेली दिसून येत आहे. नियमित स्वच्छता आणि दुरुस्तीच्या अभावामुळे ही सुविधा वापरण्यायोग्य राहिलेली नसल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे. शौचालय बंद अवस्थेत असल्याने काही नागरिक कार्यालय परिसरातच उघड्यावर शौच, लघुशंका तसेच अंघोळ करत असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून अस्वच्छतेमुळे आरोग्यविषयक समस्या निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.





याच परिसरात महाराष्ट्र शासनाचे धान्य गोदाम कार्यरत असून येथून तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदारांना अन्नधान्याचे वितरण केले जाते. तसेच महत्त्वाची रेकॉर्ड रूम असल्याने विविध दाखले व शासकीय कागदपत्रांसाठी नागरिकांची येथे सतत वर्दळ असते. अशा महत्त्वाच्या शासकीय परिसरात अस्वच्छतेचे वातावरण निर्माण झाल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. शासनाच्या निधीतून उभारण्यात आलेल्या सार्वजनिक सुविधेची झालेली दुर्दशा ही गंभीर बाब असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शौचालयाची तातडीने स्वच्छता करून आवश्यक दुरुस्ती करावी, नियमित देखभाल व्यवस्था सुरू करावी तसेच सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# कत्तलीसाठी बांधून ठेवलेल्या ९ गोवंशीय जनावरांची सुटका; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**आरंभ मराठी । भूम**

भूम शहरातील हाडळ परिसरात कत्तलीसाठी बांधून ठेवण्यात आलेल्या ९ गोवंशीय जनावरांची स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सुटका करत संबंधिताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दिनांक १७ जून २०२६ रोजी पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर व अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांच्या आदेशानुसार पथक पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय माहिती मिळाली. भूम येथील हाडळ परिसरात प्रकाश चौधरी यांच्या शेतातील मोकळ्या जागेत गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी बांधून ठेवण्यात आल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर पथकाने सायंकाळी छापा टाकला. छाप्यात मोकळ्या जागेत चारा व पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता आखूड दोरीने झाडे व लाकडांना निर्दयपणे बांधून ठेवलेली ९ गोवंशीय जनावरे आढळून आली. यामध्ये ५ जर्सी गायी, २ कालवडी, १ गिर गाय आणि १ खिल्लार जातीचे जनावर यांचा समावेश असून त्यांची अंदाजे किंमत १ लाख २० हजार रुपये आहे. या जनावरांबाबत परिसरातील नागरिकांकडे चौकशी केली असता ती जनावरे मुस्तफा कुरेशी (वय ३८, रा. भूम, ता. भूम) याच्या मालकीची असून कत्तलीसाठी बांधून ठेवण्यात आल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी सर्व जनावरे ताब्यात घेऊन भूम पोलीस ठाण्यात हजर केले. याप्रकरणी मुस्तफा कुरेशी याच्याविरुद्ध भूम पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३६७/२०२६ अन्वये प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६० मधील कलम ११(१)(एफ) व ११(१)(एच) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांच्या नेतृत्वाखाली सपोनि अमोल मोरे, पोहेकॉ समाधान वाघमारे, बळीराम शिंदे, मपोहेकॉ शोभा बांगर, पोलीस नाईक अशोक ढगारे, चापोअं दहीहांडे आदींच्या पथकाने केली.

# गुटखा आटोक्यात, आता मटक्याचे पेव; भूम तालुक्यात अवैध धंद्यांवर कारवाईची मागणी


**आरंभ मराठी । भूम**

भूम शहर व तालुक्यात काही महिन्यांपूर्वी सहज उपलब्ध होणारा गुटखा प्रशासनाच्या कठोर कारवाईमुळे मोठ्या प्रमाणात आटोक्यात आल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे गुटखा विक्री व सेवनावर काही प्रमाणात नियंत्रण मिळाल्याचे समाधान नागरिकांकडून व्यक्त केले जात आहे. मात्र गुटख्याचा प्रश्न नियंत्रणात येत असतानाच आता शहर व तालुक्यात अवैध मटका व्यवसाय पुन्हा जोमाने सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे. काही ठिकाणी खुलेआम मटका अड्डे सुरू असल्याचे बोलले जात असून, त्यामुळे युवकांसह सर्वसामान्य नागरिक आर्थिक नुकसानाच्या गर्तेत ओढले जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. गुटख्याप्रमाणेच मटका हा देखील समाजासाठी घातक प्रकार असून अनेक कुटुंबांचे आर्थिक संतुलन बिघडविणारा आहे. अवैध जुगारामुळे गुन्हेगारी प्रवृत्तींनाही चालना मिळण्याची शक्यता असल्याने यावर वेळीच नियंत्रण मिळविणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. गुटखा विक्री रोखण्यासाठी ज्या पद्धतीने प्रशासनाने प्रभावी मोहीम राबवून कारवाई केली, त्याच धर्तीवर मटका व्यवसायाविरोधातही विशेष मोहीम हाती घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. गुटखा आऊट झाला, आता मटका इन होऊ नये, अशी भावना व्यक्त करत शहर व तालुक्यातील अवैध मटका अड्ड्यांवर तातडीने धडक कारवाई करण्याची अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

# एमएचटी-सीईटीमध्ये ईटच्या पृथ्वीराज देशमुख व ओमराजे चव्हाण यांचे घवघवीत यश

**आरंभ मराठी । भूम**

भूम तालुक्यातील ईट येथील जिल्हा परिषद प्रशालेचे माजी विद्यार्थी पृथ्वीराज देशमुख आणि ओमराजे चव्हाण यांनी एमएचटी-सीईटी (PCM) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत गावासह शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे. पृथ्वीराज देशमुख यांनी 98.44 टक्के, तर ओमराजे चव्हाण यांनी 96.84 टक्के गुण मिळवून गुणवत्तेची छाप पाडली. दोन्ही विद्यार्थ्यांनी ईट येथील जिल्हा परिषद प्रशालेत प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी त्यांनी हैदराबाद येथील नारायण स्कूलमध्ये प्रवेश घेतला. सातत्यपूर्ण अभ्यास, ध्येयनिष्ठा आणि कठोर परिश्रम यांच्या बळावर त्यांनी हे यश मिळवले. जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रताप देशमुख यांचे पुत्र पृथ्वीराज देशमुख यांनी पालकांच्या मार्गदर्शनासह स्वतःची जिद्द आणि चिकाटी कायम ठेवत उत्कृष्ट



यश मिळवले. तर ओमराजे चव्हाण यांचे वडील आप्पासाहेब चव्हाण हे कृषी केंद्र चालक असून त्यांनी मुलाच्या शिक्षणासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्याच परिश्रमांचे फळ म्हणून ओमराजे यांनीही उल्लेखनीय गुण मिळवत नावलौकिक प्राप्त केला. ईट येथील या दोन्ही विद्यार्थ्यांनी एमएचटी-सीईटीसारख्या स्पर्धात्मक परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल ग्रामस्थ, जिल्हा परिषद प्रशालेचे शिक्षक, माजी शिक्षक तसेच शिक्षणप्रेमी नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# निकिता राजेश कांबळे यांना वनस्पतीशास्त्र विषयात पीएच.डी पदवी प्रदान

**आरंभ मराठी । नळदुर्ग**

निकिता राजेश कांबळे यांना नुकतीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने वनस्पतीशास्त्र या विषयात पीएचडी पदवी बहाल केल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नळदुर्ग येथील वनस्पतीशास्त्र विषयाचे विभागप्रमुख डॉ उद्धव भाले यांच्या मार्गदर्शनाखाली निकिता कांबळे हिने पीएच डी चे संशोधन पूर्ण केले आहे. निकिता कांबळे हिने ' स्टडीज ऑन अरबसकुलार मायकोरायझल फनजाय आसोसीयटेड वूथ



वाईल्ड लिफी वेजीटेबल फ्रॉम अमेरनथेशी फॅमेली' या विषयावर विद्यापीठाकडे आपला प्रबंध सादर केला होता. तिने केलेले हे संशोधन शेतीमधील पीक उत्पादन वाढीसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. मॉयकोरायझल फनजाय ही एक वनस्पतीच्या मुळावर वाढणारी उपयुक्त बुरशी आहे. सद्या सर्वत्र शेतकरी प्रामुख्याने या जैविकबुरशीजन्यचा खत म्हणून वापर करीत आहेत. शिवाय वनस्पतीवर पडणाऱ्या रोगांचे निर्मूलन सुद्धा ही बुरशी करते. अशाप्रकारचे महत्वपूर्ण आणि उपयुक्त संशोधन निकिता कांबळेने केलेले आहे. त्यामुळे तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. तिच्या या यशाबद्दल बालाघाट शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, सचिव उल्हास बोरगांवकर ,कार्याध्यक्ष रामचंद्र आलुरे संचालक बाबूराव चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुभाष राठोड यांनी अभिनंदन केले.

आरंभ मराठी

## पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते होणार पीएम किसान योजनेच्या हप्त्याचे वितरण

# 20 जून रोजी साजरा होणार'पीएम किसान उत्सव दिवस'

**आरंभ मराठी । धाराशिव**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजनेअंतर्गत एप्रिल ते जुलै २०२६ या कालावधीतील २३ वा हप्ता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २० जून २०२६ रोजी पश्चिम बंगालमधील हुगळी जिल्ह्यातील तारकेश्वर येथून वितरित करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने २० जून हा दिवस देशभरात 'पीएम किसान उत्सव दिवस' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्नाचा आधार मिळावा या उद्देशाने केंद्र शासनाने फेब्रुवारी २०१९ पासून प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना सुरू केली आहे. या योजनेनुसार पात्र शेतकरी कुटुंबांना (पती, पत्नी व १८ वर्षांखालील अपत्ये) दरवर्षी तीन समान हप्त्यांमध्ये प्रत्येकी दोन हजार रुपये, असे एकूण सहा हजार रुपये थेट आधार संलग्न बँक खात्यात जमा केले जातात.राज्यातील पात्र शेतकरी कुटुंबांना यापूर्वीही या योजनेचा लाभ मिळालेला आहे. योजनेचा लाभ मिळण्यासाठी लाभार्थ्यांनी भूमी अभिलेख नोंदणी अद्ययावत करणे, बँक खाते आधारशी संलग्न करणे तसेच ई-केवायसी प्रमाणीकरण पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे.या तीनही अटींची पूर्तता केलेल्या शेतकरी कुटुंबांच्या आधार संलग्न बँक खात्यात २० जून रोजी थेट लाभ हस्तांतरणाद्वारे रक्कम जमा होणार आहे.केंद्र शासनाने पीएम किसान योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थीकडे 'फार्मर आयडी' असणेही आवश्यक केले आहे. कृषी विज्ञान केंद्रे, जिल्हा,तालुका व ग्रामपंचायत स्तरावरील कार्यालये, कृषी उत्पन्न बाजार समित्या, संशोधन केंद्रे, शेतकरी उत्पादक कंपन्या (एफपीसी), शेतकरी उत्पादक संघटना (एफपीओ) तसेच प्राथमिक कृषी पतसंस्था (पीएसीएस) येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. नागरी सुविधा केंद्रांमधूनही कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपणात सहभागी होता येणार आहे.राज्यात कृषी विभाग,महसूल व वन विभाग तसेच ग्रामविकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा उत्सव साजरा करण्यात येणार आहे.



## रोहिणी-मृग कोरडेच, शेतकऱ्यांची भिस्त आता आर्द्रा नक्षत्रावर; पेरण्या लांबणीवर पडल्याने चिंता वाढली

# पावसाअभावी संपूर्ण मृग नक्षत्र कोरडे; बळीराजाचे आभाळाकडे डोळे

आरंभ मराठी । धाराशिव

**धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी खरीप हंगामासाठी सर्व तयारी पूर्ण केली आहे. मात्र, रोहिणी नक्षत्रासह मृग नक्षत्रातही पावसाने पूर्णपणे दडी मारल्याने पेरण्या लांबणीवर पडल्या आहेत. बळीराजाचे लक्ष आभाळाकडे लागले असून, चातकाप्रमाणे शेतकरी पावसाची आतुरतेने वाट पाहत आहेत. यंदा एल निनोच्या प्रभावामुळे मान्सूनच्या आगमनास होत असलेल्या विलंबामुळे परिसरातील शेतकरी चिंतेत दिसून येत आहेत.**



अर्धा जून महिना उलटून गेला असला तरी पावसाचे ढगही दिसून येत नाहीत. पावसाअभावी पेरण्या खोळंबल्या असून सोयाबीन, तूर, मूग, उडीद यांसारख्या प्रमुख खरीप पिकांच्या पेरण्यांचे नियोजन कोलमडले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे डोळे आता आभाळाकडे लागले आहेत. गेल्या वर्षी मे महिन्यातच मान्सूनपूर्व पावसाने चांगली हजेरी लावल्याने जूनच्या सुरुवातीलाच बहुतांश भागातील खरीप पिकांच्या पेरण्या पूर्ण झाल्या होत्या. यंदा मात्र परिस्थिती पूर्णपणे उलट आहे. उन्हाळ्यात विक्रमी तापमानाचा सामना करावा लागल्यानंतर आता पाऊस नसल्याने अद्यापही उन्हाचे चटके सोसावे लागत आहेत. सध्या जिल्ह्यात ३८ ते ४० अंश सेल्सिअस तापमानाची नोंद होत असून उष्णतेची तीव्रता वाढली आहे. वारा सुटला किंवा आभाळ दाटून आले की शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित होत आहेत. हवामान विभागाने २१ जूननंतर पेरणीस पोषक वातावरण निर्माण होण्याची शक्यता वर्तविली आहे. मात्र, त्यापूर्वी दमदार पाऊस होईल की नाही, याबाबत अनिश्चितता कायम आहे. गेल्या वर्षी रोहिणी नक्षत्रात झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या.

### रोहिणी, मृग कोरडा; शेतकऱ्यांची भिस्त आर्द्रा नक्षत्रावर

पेरणीसाठी शेतकऱ्यांनी मशागतीची कामे पूर्ण केली असली तरी अर्धा जून संपला तरी पावसाची ठोस चिन्हे दिसून येत नाहीत. त्यामुळे आता शेतकऱ्यांची सर्व भिस्त आर्द्रा नक्षत्रावर आहे. आर्द्रा नक्षत्र २२ जून रोजी सुरू होत असून, या नक्षत्रात समाधानकारक पाऊस पडल्यास पेरण्यांना वेग येईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.८ जूनपासून सुरू झालेल्या मृग नक्षत्रात आतापर्यंत पावसाची एकही सर कोसळलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे. आर्द्रा नक्षत्रातही पाऊस झाला नाही तर खरीप हंगाम धोक्यात येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पावसाअभावी सोयाबीन, मूग, उडीद आणि तूर या प्रमुख पिकांच्या पेरण्या धोक्यात आल्या आहेत. साधारणतः जूनच्या पहिल्या आठवड्यात अथवा पंधरवड्यात उडीद व मुगाच्या पेरण्या पूर्ण होत असतात. मात्र, यंदा पाऊस न झाल्याने या पिकांच्या क्षेत्रात घट होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### तरीही धाराशिव जिल्ह्यात ११२ टक्के पावसाची नोंद

यंदाच्या पावसाळ्याच्या सुरुवातीलाच मराठवाडा विभागात अतिशय संमिश्र चित्र पाहायला मिळत आहे. संपूर्ण छत्रपती संभाजीनगर विभागात जून महिन्यासाठी सरासरी ७१.५ मिमी पाऊस अपेक्षित असतो. मात्र, प्रत्यक्षात केवळ ४०.७ मिमी म्हणजेच ५६.९ टक्के पावसाची नोंद झाली आहे. संपूर्ण पावसाळी हंगामाच्या (जून ते सप्टेंबर) ६७९.५ मिमी सरासरीच्या तुलनेत आतापर्यंत केवळ सहा टक्के पाऊस पडला आहे. विशेष म्हणजे, धाराशिव जिल्ह्याला तुलनेने पावसाचा सर्वाधिक दिलासा मिळालेला आहे. जिल्ह्यात जून महिन्यात सरासरी ६७.७ मिमी पाऊस अपेक्षित असताना आतापर्यंत ७६.३ मिमी पावसाची नोंद झाली असून हे प्रमाण सरासरीच्या ११२.७ टक्के इतके आहे. तरीही जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये पावसाचे वितरण असमान राहिल्याने शेतकऱ्यांना पेरणीयोग्य पाऊस अद्याप मिळालेला नाही. त्यामुळे आकडेवारी दिलासादायक असली तरी प्रत्यक्ष शेतात पेरणीसाठी आवश्यक असलेल्या दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे.

यंदा मात्र रोहिणी नक्षत्र संपून मृग नक्षत्रातही पावसाची एकही सर कोसळली नाही. त्यामुळे पेरणीसाठी सज्ज असलेल्या शेतकऱ्यांचे संपूर्ण नियोजन विस्कळीत झाले आहे. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी मशागतीची सर्व कामे पूर्ण केली असून बियाणे आणि खतेही तयार ठेवली आहेत. मात्र, पावसाअभावी प्रत्यक्ष पेरणीला सुरुवात करता आलेली नाही.

## कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत बिजोत्पादन कार्यक्रमासाठी नोंदणी करण्याचे आवाहन

आरंभ मराठी । धाराशिव

कडधान्य आत्मनिर्भरता अभियान सन २०२६-२७ अंतर्गत तुर व उडीद पिकांच्या बिजोत्पादन कार्यक्रमाची अंमलबजावणी महाबीजमार्फत करण्यात येणार असून, या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी तातडीने नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कडधान्य उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने या अभियानाची अंमलबजावणी केली जात आहे. अभियानांतर्गत तुर व उडीद या प्रमुख कडधान्य पिकांच्या उत्पादनवाढीवर विशेष भर देण्यात आला आहे. या कार्यक्रमामध्ये तुर पिकासाठी 'गोदावरी' जातीचे ३० हेक्टर, 'रेणुका' जातीचे ५० हेक्टर,तर उडीद पिकासाठी 'फुले वसु' जातीचे २५ हेक्टर क्षेत्र निर्धारित करण्यात आले आहे. या बिजोत्पादन कार्यक्रमाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांनी लवकरात लवकर महाबीज, धाराशिव कार्यालयाशी संपर्क साधून आपली नोंदणी पूर्ण करावी,असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक एन.जी.इनामदार यांनी केले आहे.

## स्वाधार योजनेसाठी आता शासकीय वसतिगृहात अर्ज करणे बंधनकारक

**धाराशिव** :- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत मागासवर्गीय मुला-मुलींच्या शिक्षणासाठी शासकीय वसतिगृह योजना राबविण्यात येत असून, वसतिगृहांमध्ये शासनाने निर्धारित केलेल्या अटी व शर्तींनुसार विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. जिल्ह्यात सध्या एकूण ११ शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी शालेय विभागातील विद्यार्थ्यांची वसतिगृह प्रवेश प्रक्रिया ३० जून २०२६ पर्यंत,तर इयत्ता ११ वी, १२ वी तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांसाठी १५ जुलै २०२६ पर्यंत ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार आहे. शासकीय वसतिगृहांमध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो.मात्र,गुणवत्तेअभावी ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळू शकत नाही,अशा विद्यार्थ्यांसाठी शासनाची 'स्वाधार' योजना उपलब्ध आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज करणे अनिवार्य करण्यात आले आहे.त्यामुळे स्वाधार योजनेसाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींनी शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी https://hmasnew.mahait.org या संकेतस्थळावर निर्धारित मुदतीत ऑनलाइन अर्ज सादर करावा,असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त सचिन कवले यांनी केले आहे.

## भैरवनाथ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या (आयटीआय) विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात





आरंभ मराठी । कळंब

येणाऱ्या काळात तंत्रशिक्षणाला मोठे महत्त्व प्राप्त होत असून आयटीआयमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. आवश्यक कौशल्ये आत्मसात केल्यास राष्ट्रीय तसेच जागतिक स्तरावरही त्यांना मोठी मागणी राहील, असे प्रतिपादन कळंबच्या अप्पर तहसीलदार प्राजक्ता पाटील साळुंखे यांनी केले. त्या वेद शैक्षणिक संकुलातील भैरवनाथ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या (आयटीआय) विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सतीश मातने होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयाचे प्रा. डॉ. सुशील शेळके, आयटीआयचे प्राचार्य सुरज भांडे तसेच प्रा. सुकेशनी गव्हाणे-मातने उपस्थित होत्या. मार्गदर्शन करताना प्राजक्ता साळुंखे पाटील म्हणाल्या, आयटीआयचे शिक्षण पूर्ण झाले म्हणजे शिक्षणाचा प्रवास संपत नाही. उद्योग, व्यवसाय किंवा नोकरी सांभाळत असतानाच विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणाच्या संधींचा लाभ घ्यावा. बहिःस्थ शिक्षणाच्या माध्यमातून पुढील शिक्षण घेऊन स्पर्धा परीक्षांची तयारी करावी. प्रशासकीय सेवांमध्ये जाण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांनी त्या दिशेने प्रयत्न करावेत. हे क्षेत्र आव्हानात्मक असले तरी त्यामध्ये प्रतिष्ठा आणि संधी दोन्ही आहेत. यावेळी त्यांनी एमपीएससी परीक्षेच्या तयारीतील स्वतःचे अनुभवही विद्यार्थ्यांसमोर मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य सुरज भांडे यांनी केले. सूत्रसंचालन अविनाश म्हेत्रे यांनी तर आभार गिरीधर कवडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजकुमार शिंदे, सुप्रिया चव्हाण, दीक्षा गायकवाड आणि विनोद कसबे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## जयंती उत्सवाला सामाजिकतेची जोड; महालिंगरायवाडीत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य भेट

### छत्रपती संभाजीराजे जन्मोत्सवाचा युवा व्याख्याते लखन भोंडवे यांचे व्याख्यानाने समारोप

**मुरुम** :- उमरगा तालुक्यातील महालिंगरायवाडी येथे छत्रपती संभाजीराजे जन्मोत्सव समितीच्या वतीने छत्रपती संभाजीराजे जयंतीनिमित्त उरलेल्या निधीतून राबविण्यात आलेल्या सामाजिक उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना संपूर्ण शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. बुधवारी (दि. १७) रोजी शाळेच्या प्रांगणात झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल, कंपासपेटी व त्यातील आवश्यक साहित्य तसेच शाळा सुरू झाल्याच्या निमित्ताने खाऊचेही वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भगवान सोमवंशी होते. प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक ईश्वर नांगरे, उपसरपंच शाहूराज जाधव, प्रमुख व्याख्याते लखन भोंडवे, पत्रकार तथा इतिहास अभ्यासक मोहन जाधव, आनंद बागल, उपाध्यक्षा वसुधा चव्हाण, शिक्षणप्रेमी चंदाराणी घोरपडे, समिती सदस्य गोविंद भुसार, उत्सव समितीचे उपाध्यक्ष अमित जाधव, सचिव अर्जुन चव्हाण, किशोर रामतीर्थ आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती संभाजीराजे व राष्ट्रमाता जिजाऊंच्या प्रतिमेस अभिवादन करून झाली. यावेळी प्रमुख व्याख्याते लखन भोंडवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आजच्या पिढीने महापुरुषांच्या विचारांचा वारसा जतन करणे ही काळाची गरज आहे. अराजकता, स्वार्थ आणि मूल्यांचा ऱ्हास होत असलेल्या काळात छत्रपती संभाजी महाराजांसारख्या राष्ट्रपुरुषांचे विचारच समाजाला योग्य दिशा देऊ शकतात. शंभूराजेंचा दैदीप्यमान, शौर्यशाली आणि त्यागमय इतिहास हा तरुणांसाठी प्रेरणेचा अखंड स्रोत आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देत या साहित्याचा सदुपयोग करून स्वतःचे भविष्य घडवावे. यावेळी बालाजी जाधव, बालाजी भालेराव, रब्बानी मुल्ला, निर्मला यादव, निर्मला भोसले यांच्यासह शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन बालाजी भालेराव यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उत्सव समितीचे अध्यक्ष गणेश सोमवंशी, हिराजी पवार, बालाजी सोमवंशी, राम घोरपडे, बालाजी घोरपडे, शुभम घोरपडे, बालाजी विनायक घोरपडे, विवेक जाधव, हरी घाडगे, मंथन चव्हाण, आकाश जाधव, शुभम जाधव आदींनी विशेष परिश्रम घेतले.



### जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांची घरपट्टी माफ

छत्रपती संभाजीराजे जन्मोत्सव समितीने विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या सामाजिक उपक्रमाने प्रभावित होऊन गावचे उपसरपंच शाहूराज जाधव यांनी जिल्हा परिषद शाळेत इयत्ता पहिलीमध्ये नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबांची संपूर्ण घरपट्टी माफ करण्याची घोषणा केली. त्यांच्या या निर्णयाचे उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले. शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी घेतलेला हा निर्णय ग्रामस्थांमध्ये चर्चेचा विषय ठरला असून सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण म्हणून त्याचे कौतुक होत आहे.

दैनिक आरंभ मराठी

## शिक्षणाधिकारी डॉ. रवींद्र खंदारे यांचे आवाहन

# प्रतिक्रिया नव्हे, प्रतिसाद द्या; समस्यांना सामोरे जाऊन प्रगती साधा

आरंभ मराठी । कळंब

जीवनात समस्या निर्माण होतात. त्या समस्यांचे विश्लेषण करून त्यांना धैर्याने सामोरे जात स्वतःचा विकास घडवावा. समस्या ही प्रगतीचा मार्ग असते. मुलांमध्ये प्रचंड ऊर्जा असून माहितीचे रूपांतर ज्ञानात झाले पाहिजे. प्रतिक्रिया देण्यापेक्षा विचारपूर्वक प्रतिसाद देण्याची वृत्ती विद्यार्थ्यांनी जोपासली पाहिजे. जीवन ही एक शाळा असून प्रत्येक टप्प्यावर परीक्षा असते. त्या परीक्षा यशस्वीपणे पार करण्याची क्षमता शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तथा साहित्यिक डॉ. रवींद्र खंदारे यांनी केले. ढोकी रोड, कळंब येथील साई मंगल कार्यालयात बुधवारी (दि.१७) किसनलाल जाजू व गोविंद जाजू स्मृती समारोह समिती आयोजित इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी सत्कार व करिअर मार्गदर्शन कार्यक्रमात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष सुरेश टेकाळे होते. यावेळी गटशिक्षणाधिकारी संतोष माळी, साहित्यिक व करिअर मार्गदर्शक राहुल इंगळे पाटील, कार्यक्रमाचे प्रवर्तक श्रीनिवास जाजू व महेश जाजू यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी इयत्ता दहावी बोर्ड परीक्षा २०२५-२६ मध्ये १०० टक्के गुण मिळवून तालुक्यात प्रथम आलेल्या दर्शन जनार्धन भामरे यांचा स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख १० हजार रुपये देऊन गौरव करण्यात आला. तसेच तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. ९१ टक्क्यांहून अधिक गुण मिळविणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पाच विद्यार्थ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात आले. तालुक्यात शंभर टक्के निकाल लागलेल्या नऊ शाळांचाही गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जगदीश जाजू यांनी केले. स्वर्गीय किसनलाल जाजू व गोविंद जाजू यांच्या जीवनकार्याची माहिती बालाजी अडसूळ यांनी दिली. पाहुण्यांचा परिचय काकासाहेब मुंडे व माधवसिंग राजपूत यांनी करून दिला. सूत्रसंचालन सोपान पवार यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. अशोक शिंपले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बालाजी अडसूळ, डॉ. गिरीश कुलकर्णी, राजेंद्र बिक्कड, उन्मेश पाटील, विक्रम गायकवाड, सचिन क्षीरसागर, प्रशांत पडवळ तसेच जाजू कुटुंबीयांनी विशेष परिश्रम घेतले.

# दिव्यांग विद्यार्थ्यांना सहाय्यक साहित्याचे वाटप

### भूम तालुक्यातील 35 विद्यार्थ्यांना लाभ

आरंभ मराठी । भूम

भूम तालुक्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस चालना मिळावी तसेच त्यांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी कमी व्हाव्यात, या उद्देशाने आवश्यक शैक्षणिक व विशेष सहाय्यक साहित्याचे वाटप करण्यात आले. भूम पंचायत समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात गटविकास अधिकारी लक्ष्मण वाजे यांच्या हस्ते साहित्याचे वितरण करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे यंदाही ALIMCO (कानपूर) संस्थेमार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी तपासणी व मोजमाप शिबिर आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार विविध सहाय्यक साहित्याची निवड करून ते संस्थेमार्फत उपलब्ध करून देण्यात आले. या उपक्रमांतर्गत तालुक्यातील 35 दिव्यांग विद्यार्थ्यांना व्हीलचेअर, क्रोचेस, कुबड्या, श्रवणयंत्रे, सीपी चेअर, टीएलएम किट, रोलेटर (वॉकर) तसेच कॅलिपर यांसारख्या साहित्याचे वाटप करण्यात आले. या साहित्यामुळे विद्यार्थ्यांच्या हालचाली, शिक्षण आणि दैनंदिन व्यवहार अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे. कार्यक्रमास गटविकास



अधिकारी लक्ष्मण वाजे, सहाय्यक गटविकास अधिकारी शिवानी दैन, सहाय्यक प्रशासन अधिकारी रंजना कदम, गटशिक्षणाधिकारी अनिता जगदाळे, कार्यालयीन विस्तार अधिकारी सूर्यकांत साळुंके यांच्यासह केंद्रस्तरीय विशेष शिक्षक संजय कुलकर्णी, विजयकुमार कोकाटे, सागर रसाळ, भाऊसाहेब बेडके, कीर्ती शिंदे तसेच पंचायत समितीचे कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी दिव्यांग विद्यार्थ्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणात सातत्य राखण्याचे आणि शासनाच्या विविध सुविधांचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय कुलकर्णी यांनी केले. विजयकुमार कोकाटे यांनी प्रास्ताविकातून उपक्रमाची माहिती दिली, तर सागर रसाळ यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# प्रज्ञावेध 2026 : विद्यापीठ उपपरिसरात आज एज्युकेशन एक्स्पो

**आरंभ मराठी । धाराशिव**

विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या विविध संधींची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या धाराशिव उपपरिसरात 'प्रज्ञावेध २०२६' अंतर्गत एज्युकेशन एक्स्पोचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, १९ जून २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत प्रशासकीय इमारतीतील सभागृहात हा उपक्रम होणार असून विद्यार्थी, पालक आणि शिक्षणप्रेमी नागरिकांसाठी तो खुला असणार आहे. विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाल्यानंतर विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम, प्रवेश पात्रता, शुल्क रचना तसेच रोजगार व करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. कुलगुरू प्रा. डॉ. विजय फुलारी, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. प्रवीण वक्ते आणि कुलसचिव प्रा. डॉ. प्रशांत अमृतकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती उपपरिसर संचालक प्रा. डॉ. रमेश चौगुले यांनी दिली. या एज्युकेशन एक्स्पोमध्ये उपपरिसरातील दहा शैक्षणिक विभागांचे स्वतंत्र स्टॉल उभारण्यात येणार आहेत. इंग्रजी, शिक्षणशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, जैवतंत्रज्ञान, जल व भूमी व्यवस्थापन, व्यवस्थापनशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित तसेच नाट्यशास्त्र व लोककला या विभागांतील अभ्यासक्रमांची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली जाणार आहे. याशिवाय विविध क्षेत्रांतील रोजगाराच्या संधी, करिअरच्या दिशा आणि उच्च शिक्षणाच्या पर्यायांबाबतही मार्गदर्शन केले जाणार आहे. प्रवेश प्रक्रिया, अर्हता निकष आणि शुल्कासंदर्भातील माहिती पुस्तिकांद्वारेही उपलब्ध करून देण्यात येणार असून विद्यार्थी व पालकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी उमरगा, नळदुर्ग व येरमाळा पोलीस ठाण्यात तीन गुन्हे दाखल

आरंभ मराठी / धाराशिव

जिल्हाधिकाऱ्यांच्या शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन करून विनापरवाना धारदार शस्त्रे बाळगणाऱ्या तिघांविरुद्ध उमरगा, नळदुर्ग आणि येरमाळा पोलीस ठाण्यात स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांनी कारवाई करत संबंधित शस्त्रे जप्त केली आहेत. उमरगा पोलीस ठाण्याच्या हद्दीत कुंभारपट्टी परिसरात राम भागवत जाधव (रा. कवठा, ता. उमरगा, सध्या रा. कुंभारपट्टी, उमरगा) हा व्यक्ती ५०० रुपये किंमतीची लोखंडी तलवार विनापरवाना बाळगत असल्याचे पोलिसांना आढळून आले. याप्रकरणी पोलीस नाईक यासीर नसीर सय्यद यांच्या फिर्यादीवरून शस्त्र कायदा कलम ४, २५, भारतीय न्याय संहिता कलम २२३ व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नळदुर्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीत हरिओम मनोज सावंत (वय १९, रा. उमरगा ची, ता. तुळजापूर) याच्या ताब्यात विनापरवाना तलवार आढळून आली. पोलीस अमलदार सुदर्शन व्यंकट घुले यांच्या फिर्यादीवरून शस्त्र कायदा कलम ४, २५ व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर येरमाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीत तेरखेडा येथील राष्ट्रीय महामार्ग ५२ लगत सुर्या

२८ जून रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम

मोहीम यशस्वी करण्याचे जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांचे आवाहन

आरंभ मराठी / धाराशिव

राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम शंभर टक्के यशस्वी करण्यासाठी पाच वर्षांखालील एकही बालक पोलिओ लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करावे,असे आवाहन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी केले. राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेच्या अनुषंगाने जिल्हा समन्वय